**MHKO100009742023**

**रे.क.नं. १९५/२०२३ मधील निशाणी क्र. २७ वरील आदेश**
**पार्वती खांडेकर वि. शिवाजी खांडेकर**

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१५ शिवाजी लक्ष्मण बुगडे व प्रतिवादी क्र.१६ रामचंद्र धोंडीबा यडूरकर यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१५ हे दिनांक २६/०६/२०२१ रोजी व प्रतिवादी क्र.१६ हे दिनांक ०६/१०/२०१४ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद हेच सरळ व कायदेशिर वारस आहेत. प्रतिवादी क्र.१५ व १६ यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेवून त्याबाबतची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जात नमुद केलेली कारणे चुकीची आहेत. वारस रेकॉर्डवर आणण्यास जाणुनबुजून विलंब केला आहे. न्यायाचे कारणास्तव अर्ज मंजूर केल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी.

३. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द हद्दी निश्चीत होवून, फिल्ड पाडून मिळणेकरीता व कायम मनाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्र.१५ शिवाजी लक्ष्मण बुगडे व प्रतिवादी क्र.१६ रामचंद्र धोंडीबा यडूरकर यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. वादी यांचा वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवून

मिळणेबाबतचा अर्ज व  प्रतिवादी क्र.१५ व १६ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी दाव्यात प्रतिवादी क्र.१५ व प्रतिवादी क्र.१६ यांच्या वारसाबाबत योग्य ती दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत त्याच दिवशी दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.10.14 17:39:05 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक १४/१०/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज